# <u>वार्तापत्र</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली**
**दिनांक ०४/०१/२०१९**

## ‘गडचिरोली पोलीसांनी केली रस्ता सुरक्षा बाबत जागृती ’

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमीत्त गडचिरोली पोलीस दलाने दिनांक २ जानेवारी ते ८ जानेवारी या कालावधीत रेझींग डे च्या माध्यमातुन विविध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. आज दिनांक ४/१/२०१९ रोजी गडचिरोली पोलीसांनी वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले. त्यामध्ये विविध शाळा, महाविदयालय येथे भेटी देवून तेथील विदयार्थ्यांना वाहतुक नियमाबाबत मागदर्शन करण्यात आले तसेच त्यांना रस्ता सुरक्षा संबंधात मार्गदर्शनपर पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

तसेच सायंकाळी ०५.०० वा. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची मोटार सायकल हेल्मेट रॅली काढण्यात आली. सदर रॅलीस मा. अपर पोलीस अधिक्षक श्री महेंद्र पंडित सा. यांनी हिरवा झेंडा दाखवुन सुरवात करण्यात आली. मोटार सायकल हेल्मेट रॅली ही पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली येथुन सुरु होवुन आय.टी.आय. चौक, कारगिल चौक, इंदीरा गांधी चौक, आरमोरी रोड, बस डेपो, चामोर्शी रोड मार्गाने परत पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे सांगता करण्यात आली. सदर रॅलीत मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. मोहित गर्ग हे सहभागी होवून त्यांनी रॅलीचे नेतृत्व केले. रॅलीत १२५ ते १५० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सहभागी होवून सर्वानी हेल्मेटचा वापर करुन जनतेला दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करण्याबाबत संदेश देण्यात आला.

